गाँधी रिसर्च फाउण्डेशन

विज्ञानं जनहिताय


मराठी विज्ञान परिषद

संयुक्तपणे आयोजित

स्मॉल इज ब्यूटीफुल

# राष्ट्रीय
# नवसंशोधन
# स्पर्धा






## संकल्पना

सद्यस्थितीत विज्ञानातील अनेक संशोधने व त्यांचा वापर नैतिकतेच्या मापदंडावर फोल ठरत आहेत. म्हणूनच या कालखंडात नैतिक मूल्यांना प्राधान्य देणारे वैज्ञानिक संशोधन होणे गरजेचे झाले आहे. प्रस्तुत संशोधन अल्प स्वरुपात असले तरी समाजासाठी त्याची उपयुक्तता असेल हा प्राथमिक निकष असला पाहिजे. त्याचबरोबर विद्यार्थ्यांमध्ये रचनात्मकता, सर्वसमावेशकता, शोषणमुक्त व शाश्वत समाज निर्माण करण्याची मानसिकता तयार करण्याचे वातावरण निर्माण झाले पाहिजे. छोट्या संशोधनाच्या माध्यमातून गांव - खेड्यांना नवीन दिशा मिळेल, परिणामी महात्मा गांधीजींची 'ग्रामस्वराज' कल्पना प्रत्यक्षात अस्तित्वात येईल. मनुष्य नैतिकतेच्या आधारावर आपला वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करू शकेल व त्याची सुरुवात विद्यार्थी दशेपासून झाली पाहिजे, हीच भूमिका गांधी रिसर्च फाउण्डेशन व मराठी विज्ञान परिषद यांची आहे. प्रस्तुत संस्थांच्या माध्यमातून समाजाला योग्य दिशेने प्रभावित करणाऱ्या संशोधनाला विचारपीठ निर्माण करुन देण्याचा मानस आहे.

गांधी विचारांच्या पार्श्वभूमीवर विकेंद्रिकरण पर्यावरणपूरक, उपयोगी व शाश्वत तंत्रज्ञान निर्माण करण्याच्या प्रक्रियेत विद्यार्थ्यांना सहभागी करुन त्यांच्यातील कल्पनाशक्तीला वाव देण्यासाठी **'स्मॉल इज ब्युटीफूल'*.** या राष्ट्रीय नवसंशोधन स्पर्धेचे आयोजन केले आहे.

**(प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ ई. एफ. शुमाकर यांनी महात्मा गांधीजींपासून प्रेरणा घेत मध्यवर्ती, सर्व समावेशक, स्वदेशी, तंत्रज्ञानाचा पुरस्कार केला. त्यांच्या द्वारा लिखित 'स्मॉल इज ब्युटीफूल' या पुस्तकात तंत्रज्ञानाला मानवीय चेहरा देण्यासाठीचा सिद्धांत मांडला आहे. )*



## प्रामुख्याने खालील क्षेत्रातील प्रयोगांना या स्पर्धेत स्थान असेल.

- **पर्यावरण** – जल, हवा प्रदूषण कमी करणे. शुद्ध पाणी उपलब्ध व्हावे म्हणून ग्रामस्तरावर अंमलबजावणी करता येणारे प्रयोग, जैव विविधता नष्ट होण्यापासून वाचवणे, ती जपणे.
- **ऊर्जा** – वीज उत्पादन करणारे पर्यावरणपूरक प्रयोग, हरित ऊर्जा,बायोगॅस, जैव इंधन, विजेचा वापर कमी करून नैसर्गिक साधनांद्वारा गरजा पूर्ण करणारे मॉडेल.
- **सूचना आणि दळणवळण** – प्रदूषण मुक्त वाहने. आधुनिक उपकरणे उदारणार्थ टेलिफोन, रेडिओ, मोबाइल, इंटरनेट यांचा वापर करून सुविधा उपलब्ध करून देणे.
- **स्वच्छता** – कचऱ्याचे विभाजन, कचऱ्याची पूनर्प्रक्रिया व पूनर्वापर, सांडपाण्याचे नियोजन व पूनर्वापर, स्वच्छतेची नवीन साधने.
- **रोजगार व ग्रामोदय** – कुटीर उद्योग वाढविण्यासाठी संशोधन, खेडे व शहरातले अंतर मिटविण्यासाठीचे शोध, आत्मनिर्भर गाव
- **कृषी** – शाश्वत शेती, कमीतकमी साधनांचा वापर, जल पूनर्भरण, सिंचन, शेतात उत्पादित होणाऱ्या मालावर प्रक्रिया, शेतमाल साठा, जैविक शेती, खते, बियाणे, किटकनाशके, यावर जैविक उपाय.
- **शिक्षण** – रोजगाराभिमुख अभ्यासक्रम, हरित शाळा , बुनियादी शिक्षा




## मॉडेल निवडीचे निकष

- विधायक / सृजनशील कल्पनाशक्ती
- प्रयोगातील मूळ कल्पना आणि नाविन्य
- आर्थिकदृष्ट्या किफायती, टिकाऊपणा, पर्यावरणपूरक
- शैक्षणिक मूल्य
- शास्त्रीय विचार व दृष्टिकोन/ भूमिका
- तांत्रिक कौशल्य (कला व कारागिरी)
- सादरीकरण व स्पष्टीकरण
- उपयोगिता

## स्पर्धेचे नियम व अटी –

- ऑनलाईन नोंदणी अर्ज भरून प्रवेश निश्चित केला जाईल.
- स्पर्धेसाठी प्रवेश विनामूल्य असेल.
- स्पर्धा पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी खुली आहे.
- स्पर्धेसाठी दोन गट असतील. ♦ **प्रथम गट -पाचवी ते सातवी** ♦ **द्वितीय गट – आठवी ते दहावी**
- संबंधित शाळा / शिक्षकांनी विद्यार्थ्यांना मॉडेल तयार करण्यासाठी कृपया मार्गदर्शन करावे.
- स्पर्धेत समजा **शाळेचा सहभाग नसला तरी विद्यार्थी वैयक्तिकरित्या स्वतंत्रपणे** किंवा **संघरूपात (ग्रुप)** स्पर्धेत सहभागी होऊ शकतात.
- विद्यार्थी संघ या दृष्टीने स्पर्धेत सहभागी होऊ शकतात. पुरस्कार संघ म्हणून दिला जाईल.
- एका संघात जास्तीत जास्त 3 विद्यार्थी असावेत. संघातील एका स्पर्धकाचे नाव संपर्कासाठी द्यावे लागेल.
- सहभागी प्रत्येक विद्यार्थ्याला अनुक्रमांक, लॉगीन आय डी आणि पासवर्ड दिला जाईल.
- विषय / मॉडेल समजावून सांगण्यासाठी 5 मिनिटाचा व्हिडिओ असावा.
- स्पर्धकांनी आपल्या मॉडेलच्या छायाचित्रासोबत, संकल्पना असलेली फाईल 300 शब्दात [pdf / word] लिहून सादर करावी.
- प्रवेशित मॉडेलमधून निवड समितीने निवडलेले मॉडेल सोशल मिडीयावर अपलोड केले जातील. त्यांना तेथे मिळालेल्या लाईक्स व निवड समितीने दिलेले गुण एकत्र करून विजेते निवडले जातील
- स्पर्धेत सादर करण्यात येणारे मॉडेल, कल्पना या पूर्णपणे नवीन असाव्यात. त्या पूर्वी कुठेही प्रदर्शित झालेल्या नसाव्यात, तसे आढळल्यास आपली नोंदणी रद्द केली जाईल.
- परीक्षकांचा निर्णय अंतिम राहील.
- स्पर्धेच्या नियम व अटीत बदल करण्याचा अधिकार आयोजकांना आहे.
- स्पर्धेत आपण सहभागी झाला याचा अर्थ आपणास स्पर्धेचे सर्व नियम व अटी मान्य आहे असे गृहीत धरले जाईल.

## मॉडेलचे व्हिडिओ क्लिप्स तयार करतानाचे नियम

व्हिडिओच्या सुरुवातीला स्पर्धकाने आपला पूर्ण परिचय द्यावा [नाव, गाव, शाळेचे नाव].
तसेच मी/ आम्ही गांधी रिसर्च फाउण्डेशन, जळगाव व मराठी विज्ञान परिषदेद्वारा आयोजित राष्ट्रीय नवसंशोधन स्पर्धेत ........*(मॉडेलचे नाव)*.......मॉडेल प्रस्तुत करित आहे असा उल्लेख करावा.
मॉडेल सादर करताना खालील मुद्यांचे स्पष्टीकरण देणे आवशक आहे.

- स्पर्धकाचे किंवा गटाचे नाव
- शीर्षक
- सारांश
- विज्ञानिक दृष्टिकोन
- गृहिते
- साहित्य
- पद्धत
- माहिती / परिणाम
- विश्लेषण
- निष्कर्ष

a. स्पर्धकाला मराठी, हिंदी, इंग्रजी यापैकी एकाच भाषेत एकच व्हिडिओ पाठविता येईल.

b. क्लिप जास्तीत जास्त 5 मिनिटांची असावी. (मर्यादा 500एमबी)


c. मोबाईल कॅमेरा तसेच इतर कॅमेराद्वारे व्हिडिओ तयार केलेला असावा.

d. रेकॉर्डिंगचे ओरिएंटेशन आडवेच (Horizontal) ठेवावे.

e. व्हिडीओ करताना योग्य प्रकाश असावा व सभोवताली शांत वातावरणात व सुस्पष्ट उच्चारांसह तयार करण्यात यावा.

f. आपल्या द्वारा तयार करण्यात आलेले मॉडेल पूर्ण झाल्यानंतर स्पर्धकाचे ओळखपत्र, आधारकार्ड, पासपोर्ट साईज फोटो तसेच मॉडेलचा व्हिडीओ, मॉडेलचे छायाचित्र व संकल्पना स्पर्धकाला देण्यात आलेला अनुक्रमांक, आयडी, आणि पासवर्डद्वारा खाली दिलेल्या लिंक वर जमा करावे.

लिंक: **http://gandhifoundation.net/NICF/index.htm**




## सुरक्षेचे उपाय

- सर्वांची सुरक्षा मुख्यत: विचारात घ्यावी.
- गंभीर स्वरूपाची शारीरिक दुखापत, संपत्तीचा नाश, पर्यावरणास हानी पोहोचणार नाही, कायदेशीर अडचण येणार नाही याची स्पर्धकांनी काळजी घ्यायची आहे.
- स्पर्धक त्यांच्या सर्वसाधारण सुरक्षा, रसायन, आग, वीज, तसेच अन्य प्रकरच्या सुरेक्षेसाठी स्वतःच जबाबदार असतील.
- प्रयोगात जिवंत प्राणी, पक्षी वापरता येणार नाही.

## पुरस्कार तथा प्रमाणपत्र

- प्रत्येक सहभागी स्पर्धकाला सहभाग प्रमाणपत्र दिले जाईल.
- प्राथमिक स्तरावर निवड झालेल्या स्पर्धकांच्या मार्गदर्शक / शिक्षक यांनाही प्रमाणपत्र दिले जाईल.
- पुरस्कारप्राप्त स्पर्धकांच्या शाळांना सन्मानचिह्न देऊन गौरविण्यात येईल.
- आपले मॉडेल नाविन्यपूर्ण व समाजहिताच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असेल तर त्या मॉडेलचे पेटंट मिळविण्यासाठी मार्गदर्शन व सहकार्य केले जाईल.
- प्रत्येक गटात तीन विजेता व चार उत्तेजनार्थ पुरस्कार खालील प्रमाणे दिले जातील.



*खालील रोख रकमेच्या मूल्याइतके शैक्षणिक साहित्य प्रदान केले जाईल.

| | | | |
|---|---|---|---|
| ♦ प्रथम पुरस्कार | ₹ 31,000/-* | ♦ द्वितीय पुरस्कार | ₹ 21,000/- * |
| ♦ तृतीय पुरस्कार | ₹ 15,000/-* | ♦ प्रोत्साहन पुरस्कार -4 | ₹ 5,000/-* |

## मार्गदर्शन आणि निवड समिती


डॉ. अनिल काकोडकर, अध्यक्ष, गांधी रिसर्च फाउण्डेशन

प्रा. जे. बी. जोशी, अध्यक्ष, मराठी विज्ञान परिषद

श्री अनंत देशपांडे, कार्यवाह, मराठी विज्ञान परिषद

डॉ. सुदर्शन आयंगार, संचालक, गांधी रिसर्च फाउण्डेशन

डॉ. विपिन कुमार, संचालक, राष्ट्रीय नवप्रवर्तन प्रतिष्ठान



## महत्वपूर्ण तारखा

| | |
|---|---|
| प्रवेश पाठविण्याची अंतिम तारीख | 30/1/2021 |
| मॉडेल तथा संकल्पना सादर करण्याची अंतिम तारीख | 15/2/2021 |
| निवडलेले मॉडेल सोशल मीडियावर प्रसारीत करण्याची तारीख | 18/2/2021 |
| निवडलेले मॉडेल सोशल मीडियावर 'लाईक्स व कमेन्ट्स' प्राप्त करण्याची अंतिम तारीख | 26/2/2021 |
| स्पर्धेचा निकाल जाहीर करण्याची तारीख - राष्ट्रीय विज्ञान दिन | 28/2/2021 |

रजिस्ट्रेशन करण्यासाठी खालील लिंक वर क्लिक करा.
http://gandhifoundation.net/NICF/index.htm




**गांधी रिसर्च फाउण्डेशन**

गांधी तीर्थ, जैन हिल्स, जळगाव – 425001 महाराष्ट्र

संपर्क क्रमांकः 0257-2264803; 9404955220, 9823362330, 9404955226, 9422775918

E-mail: info@gandhifoundation.net, skills@gandhifoundation.net; Website: http://www.gandhifoundation.net